Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar


## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**August - 2023**

ISSUE No - (CDXXV) 425






**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr.Dinesh W.Nichit**
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
**Dr.Sanjay J. Kothari**
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – (SJIF) –8.632 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

## August -2023

ISSUE No - (CDXXV) 425

## Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr.Dinesh W.Nichit**
Editor
Principal,
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

**Dr.Sanjay J. Kothari**
Executive-Editors
Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher



Scanned with OKEN Scanner

# Editorial Board

**Chief Editor -**

**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro. Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande,** Professor Dr. P. D. College of Law, Amravati]
- **Dr. Sandip B. Kale,** Head, Dept. of Pol. Sci., Yeshwant Mahavidyalaya, Seloo, Dist. Wardha.
- **Dr. Hrushikesh Dalai** , Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responicible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

**Prof.Virag Gawande**
**Aadhar Publication** ,Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati
( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com
**Website :** www.aadharsocial.com **Mobile : 9595560278 /**



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDXXV) 425
ISSN : 2278-9308
August, 2023

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Kamala Das' Poetry: Reflection of Feminine Sensibility **Dr. Deepmala M. Patode** | 1 |
| 2 | A Case Study of the Impact of GST on Indian Economy **Dr. Phole Kamal Bhaurao** | 3 |
| 3 | Cognitive Developments of Children and it's concepts **Dr. Jyotsna Pusate** | 8 |
| 4 | Renewable Energy In India: Current Status And Future Potentials **Dr. Patil Bhagwan Shankar** | 10 |
| 5 | A Study On Green Business In India **Dr. Sou. Parvati B. Patil** | 15 |
| 6 | Critical Study Of Modern Appraisal System As Hr Tool With Special Reference To State Bank Of India" (Western Region) (20011-12 To 2021-22) **Dr. Ajay Nanaji Saratkar** | 19 |
| 7 | Stress Management at the Workplace **Dr. Amey Vinayak Kale** | 25 |
| 8 | Role of stand-up india scheme to backward class and woman empowerment. **Dr. Raju Madan Prasad** | 28 |
| 9 | पावसाळयातील आजार व आरोग्याची काळजी प्रा. डॉ. विद्या ठवकर | 30 |
| 10 | महानगरी अधोविश्व आणि स्त्रीप्रश्नांची बहुरेषीयता(भाऊ पाध्ये यांच्या कथासाहित्याच्या संदर्भात) डॉ. शीतल पावसकर-भोसले | 33 |
| 11 | गाविलगड किल्ल्याचा इतिहास व त्याची शौर्य गाथा प्रा. डॉ. गजेन्द्र बी. ढवळे | 37 |
| 12 | लोकशाही विकेंद्रीकरण आणि पंचायत राज डॉ. दिनेश सहदेवराव धाकडे | 41 |
| 13 | जमशेदजी टाटा यांचे आर्थिक विकासात योगदान डॉ .राजु अंबाडकर | 45 |
| 14 | नवीन शैक्षणिक धोरण २०२० एक अवलोकन प्रा.तिलकचंद पी.शेंडे | 47 |
| 15 | स्वामी विवेकानंद के शैक्षिक एवं सामाजिक चिंतन की वर्तमान परिपेक्ष्य में सार्थकता प्रा. शिवचरण ना. धांडे | 49 |
| 16 | आत्मनिर्भर भारत डॉ.शाहेदा मुनाफ | 56 |
| 17 | भारतीय राजकारणात राज्यपालांची भूमिका प्रा. सुरेंद्र हरिभाऊ किन्हिकर | 61 |
| 18 | धर्मनिरपेक्षता **Dr. Umeshkumar Shahare** | 64 |
| 19 | आचार्य विनोबा भावे यांचे समाजविचार व कार्य प्रा.डॉ. राजेन्द्र एम. देवाळकर | 67 |




Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 20 | आचार्य विनोबा का शिक्षा मे योगदान<br>डॉ. अमोल मांडेकर , प्रा . संजयकुमार सिताराम राठोड | 70 |
| 21 | नाशिक जिल्ह्यातील पेठ राज्य: खालसा धोरणाच्या सिद्धांताचा अंतर्भाव (१८३७)<br>डॉ. श्रीहरी रामचंद्र थोरवत | 73 |
| 22 | भारत की आझादी के लिए आदिवासी महिला सेनानियों का योगदान<br>डॉ. रोहिणी यु. देशमुख | 79 |
| 23 | Accessibility & Movement Pattern Of People And Vehicles<br>**Priyal J. Bhatt , Ar.Sanjay Deshmukh** | 82 |
| 24 | Shell Structure **Aditya G. Jogale , Ar. Sanjay Deshmukh** | 90 |
| 25 | जयशंकर प्रसाद के नारी पात्रों की सामाजिक स्थिति का अवलोकन<br>प्रा.डॉ.मस्तान शाह | 100 |
| 26 | कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांवरील ताणतणाव आणि त्यांचे शैक्षणिक संपादन– एक अध्ययन.<br>डॉ. जयंत यु. बन्सोड | 104 |
| 27 | अब्दुल बिस्मिल्लाह के उपन्यासों में चित्रित मुस्लिम समाज डॉ. माजिद पटेल | 109 |
| 28 | स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक विचार डॉ. जयंत अजाबराव जवंजाळ | 113 |
| 29 | Unlocking The Power Of Informantion : Rti's Role In Making Participative Indian Citizen's<br>**Anurag Prakash Meshram** | 115 |
| 30 | Principles For Environment Protection: An Overview<br>**Mrs. Vrushali Nitin Thorat** | 118 |
| 31 | Existential Despair Depicted in the Story ` The Treatment of Bibi Haldar`<br>**Punam V. Barabde** | 122 |
| 32 | यवतमाळ जिल्हयातील अध्यापक विदयालयातील छात्रशिक्षकांच्या आव्हाणाचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>डॉ. अनिल पी.जैन,प्रा.लक्ष्मण मारोतराव वानखेडे | 124 |
| 33 | स्वातंत्र्योत्तर महिला विकासाची वाटचाल – शासकीय योजना आणि आव्हाने<br>प्रा.डॉ.सौ. सुनिता एस.राठोड | 127 |
| 34 | बसवकालीन स्त्री वचनकारांच्या वचनांतील मौल्यवान वस्तुंचे संदर्भ डॉ. प्रवीण कारंजकर | 133 |
| 35 | नागरिकत्वाचा प्रश्न ऐरणीवर / NRC, CAA आणि NPR : कळीचे मुद्दे सतीश देशपांडे | 137 |
| 36 | एकविसाव्या शतकातील स्त्रीवाद सौ. वृषाली विजय देवकर | 146 |
| 37 | महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील पंचायतराज प्रा. डॉ. नारायण पोहकर | 151 |


Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDXXV) 425
ISSN : 2278-9308
August, 2023

# भारतीय राजकारणात राज्यपालांची भूमिका

**प्रा. सुरेंद्र हरिभाऊ किन्हिकर**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख) श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंजनगाव सुर्जी
e-mail: skinhikar2@gmail.com

**Abstract**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय राजकारणात राज्यपालाची भूमिका काय? या विषयावर प्रकाश टाकण्यात येत आहे. भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केलेला असल्यामुळे राष्ट्रपती व राज्यपाल घटनात्मक दृष्ट्या कार्यकारी प्रमुख आहेत. राज्यघटनेत अशी तरतूद आहे की घटक राज्याची संपूर्ण कार्यकारी सत्ता ही राज्यपालाकडे असेल आणि त्याच्या सल्ल्यानुसार मंत्रिमंडळ त्या सत्तेचा वापर करेल. घटनात्मक प्रमुख म्हणून राज्यपाल पद राज्य सरकारवर नियंत्रण ठेवणार आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये राज्यपाल व मंत्रिमंडळ यांचे संबंध, दोघांचे अधिकार, परस्परांवर नियंत्रण ठेवण्याची सत्ता, मुख्यमंत्र्यांचे अधिकार तसेच राज्यपालाचे घटनात्मक अधिकार, सत्ता इत्यादी बाबींवर राज्यपाल व मुख्यमंत्री यांचे संघर्षाच्या घटनांचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना:**

कलम 153 नुसार राज्याचा घटनात्मक प्रमुख राज्यपाल असेल आणि संपूर्ण कार्यपालिकेवर त्याचे नियंत्रण असेल अशी तरतूद संविधानात केलेली आहे. तसेच कलम 155 नुसार राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपती मार्फत प्रत्यक्ष पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार केली जाईल. राष्ट्रपती हा संबंधित घटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करेल. राज्यपालाचे नियुक्ती व बरखास्ती, पद नियुक्ती करण्याचा अधिकार हा राज्यपाला आहे. राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत राज्यपाल आपल्या पदावर राहतो. राज्याचा संपूर्ण राज्यकारभार हा राज्यपालाच्या नावाने चालतो राज्यपाल आपल्या कार्यकारी अधिकाराचा वापर संविधानानुसार प्रत्यक्षपणे किंवा त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यामार्फत करतो. घटनेनुसार संबंधित घटक राज्याचा मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाची नियुक्ती करण्याचा अधिकार हा राज्यपालाचा आहे. परंतु संसदीय शासन पद्धतीनुसार घटक राज्यात विधानसभा निवडणुकीत बहुमत प्राप्त करणाऱ्या पक्षाचे नेत्यालाच मुख्यमंत्री म्हणून नियुक्त करावे लागते. घटनेनुसार मुख्यमंत्रीची नियुक्ती करण्याचा अधिकार जरी राज्यपालाला असला तरी तो त्याचा औपचारिक अधिकार आहे. संपूर्ण राज्याचा राज्यकारभार जरी राज्यपालाच्या नावाने चालत असला तरी प्रत्यक्ष मुख्यमंत्री व मंत्रिमंडळच कारभार करीत असते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय राजकारणात राज्यपालाची भूमिका काय? याचा अभ्यास करण्यात येत असून घटक राज्यात मुख्यमंत्री व राज्यपाल यांच्या संबंधाचा उल्लेख करण्यात येत आहे. घटक राज्याचा कारभार हा घटनेनुसार चालतो किंवा नाही हे पाहण्यासाठीच राज्यपाल पदाची निर्मिती केली जाते परंतु भारताच्या स्वातंत्र्यानंतर राज्यपालाची भूमिका ही घटनात्मक न राहता केंद्र सरकारच्या सत्ताधारी पक्षाच्या मर्जीनुसार चालते. राज्यपाल हा कोणत्यातरी राजकीय पक्षाचा सदस्य असतो व राजकारणात अपयशी ठरलेल्या व्यक्ती, पक्षातील ज्येष्ठ व्यक्ती, मंत्री पद न मिळालेल्या व्यक्ती यांना खुश करण्यासाठी सत्ताधारी पक्ष अशा व्यक्तींची राज्यपाल पदी नियुक्त करतो. त्यामुळे साहजिकच राज्यपालाला सत्ताधारी पक्षाच्या हातातले बाहुले म्हणून कार्य करावे लागते. भारतीय संसदीय शासन पद्धतीचा विचार करता घटक राज्यात विरोधी पक्षाचे सरकार असेल तर त्या पक्षाचे दमन करण्यासाठी राज्यपाल पदाचा वापर केंद्र सरकार मार्फत करण्याची बरेच उदाहरणे आपल्याला पाहावयास मिळतील. मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांच्यातील संघर्ष हा काही काळापासून विस्कळीत झाला आहे. त्यामुळे लोकशाही राज्यपालाच्या प्रासांगिकतेवर आणि भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. केंद्र सत्तेवर असणाऱ्या पक्षाच्या विरोधी पक्षांची सरकारे ज्या राज्यात असतात तिथे राज्यपाल मुख्यमंत्री संघर्ष अधिक प्रमाणात समोर येतात. सरकारे पाडण्याची किंवा सत्तेवरून दूर करण्याची राज्यपालाची भूमिका काही नवीन नाही.

1959 मध्ये केंद्रातील नेहरू सरकारने नंबुद्रीपाद सरकार बरखास्त केले होते. ज्यात राज्यपालाचा वापर करून विविध राज्य सरकार बरखास्त केली आहेत.

1967 मध्ये पश्चिम बंगालचे राज्यपाल धरमवीर यांनी अजय मुखर्जी यांचे सरकार बरखास्त केले आणि काँग्रेसच्या पाठिंबावर यांचे पी. सी. घोष सरकार सत्तेवर आले.



Scanned with OKEN Scanner

1983-84 अविभक्त आंध्र प्रदेशातील एनटी रामाराव यांचे सरकार पाडण्यात राज्यपाल रामलाल यांची भूमिका हे राजकारण कसे खेळले जाते याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

1989 मध्ये पी वेंकट सुबैया यांच्याकडून मुंबई सरकार पाडण्यात आल्यानंतर एक कायदेशीर लढाई सुरू झाली आणि सर्वोच्च न्यायालयाचा 1994 चा एक ऐतिहासिक निकालही आहे.

एप्रिल 1994 मध्ये राज्यपाल भानुप्रताप सिंग यांनी केंद्र सरकारशी सल्ला मसलत न करता डिसूजा यांना तात्काळ बडतर्फ केले आणि वादग्रस्त माजी मुख्यमंत्री रवी नाईक यांना त्यांच्या जागी बसविले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा राज्यपाल धनखड यांच्याशी सतत वाद होत असतो. त्याचप्रमाणे तेलंगणाच्या राज्यपाल तामिळ साई सुंदरराजन यांचाही मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्याशी वाद सुरूच आहे.

महाराष्ट्रात राज्यपाल भगतसिंग कोशारी व मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यातील वाद सर्व राज्यांला माहित आहे . केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान आणि पिनराई विजयन यांच्यात समन्वय नाही. दिल्लीचे नायब राज्यपाल अनिल बैजल आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यातील संघर्षाची उदाहरणे ताजी आहेत. पुदुच्चेरीचे नायब राज्यपाल के. नारायण स्वामी यांची सरकार सोबत अनेकदा वादावादी होत असते.

1982 हरियाणात लोक दलाचे नेते चौधरी देवीलाल यांच्याकडे बहुमत होते पण तरीही ते राज्यपाल गणपत देवजी तपासे यांनी काँग्रेसच्या भजनलाल यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली.

1998 मध्ये राज्यपाल रोमेश भंडारी यांनी उत्तर प्रदेशात कल्याण सिंग यांच्या नेतृत्वातील भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षाचे सरकार बरखास्त केले व राज्यपाल रोमेश भंडारी यांनी जगदंबिका पाल यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली. कल्याण सिंह यांनी या निर्णयाला अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिले. न्यायालयाने राज्यपाल रोमेश भंडारीच्या निर्णयाला असंवैधानिक ठरविले. परिणामी जगदंबिका पाल यांना दोन दिवसातच राजीनामा द्यावा लागला होता. त्यांच्या जागी पुन्हा एकदा कल्याण सिंह मुख्यमंत्री झाले.

2005 झारखंडमध्ये त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात आली. भाजप सर्वात मोठा पक्ष होता. भाजपचे 30 आमदार निवडून आले होते तर झारखंड मुक्ती मोर्चाचे फक्त 17 आमदार निवडून आले. परंतु राज्यपाल सय्यद शिस्तेरजी यांनी 17 आमदार असलेल्या शिबू सोरेन यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली, पण शिबु सोरेन यांना बहुमत सिद्ध करता आले नाही.

बिहारमध्ये 2005 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत कोणत्याच पक्षाला बहुमत मिळाले नाही. सत्ता स्थापन करण्यासाठी सर्वच पक्षांची जुळवाजुळव सुरू होती. राष्ट्रीय लोकतांत्रिक आघाडी सरकार स्थापन करण्यासाठी तयारी करत होती, पण 22 मे 2005 च्या मध्यरात्री राज्यपाल बुटासिंग यांनी विधानसभा बरखास्त करण्याचा निर्णय घेतला. राज्यपाल बुटासिंग यांनी आमदारांचा घोडेबाजार रोखण्यासाठी आणि लोकशाही वाचविण्यासाठी आपण हा निर्णय घेत असल्याचे सांगितले होते. बुटासिंह यांच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने बुटासिंह यांचा निर्णय असंवैधानिक ठरविला.

1998 बिहारमध्ये राबडी देवी यांचे सरकार राज्यपाल व्ही. सी. पांडे यांनी बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू केली. त्यावेळी राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा निर्णय लोकसभेत मंजूर झाला पण राज्यसभेत मात्र निर्णय होऊ शकला नाही. परिणामी बिहारची सत्ता पुन्हा एकदा मुख्यमंत्री राबडी देवी यांना देण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयांनी वेळोवेळी फटकारल्यानंतरही राज्यपालांचा राजकीय कारणासाठी हस्तक्षेप कमी झालेला नाही. याची उदाहरणे द्यायची झाली तर ती गोवा आणि काश्मीरची देता येईल. 2017 मध्ये गोव्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालेले नाही. 40 सदस्यांमध्ये काँग्रेसचे 17 आणि भाजपचे 13 सदस्य होते परंतु तत्कालीन राज्यपालानी 17 सदस्य असलेल्या सर्वात मोठ्या पक्षाला सत्ता स्थापनेसाठी आमंत्रित न करता 13 सदस्य असलेल्या भाजपच्या मौखिक दाव्याला स्वीकारलं आणि त्यांना बहुमत मिळेल असे मानून मनोहर पर्रीकर यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली.

नोव्हेंबर 2018 मध्ये जम्मू काश्मीरमध्ये मेहबूबा मुक्ती यांनी नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस बरोबर सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. मेहबूबा मुक्ती यांनी आपल्याला काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्स यांचा पाठिंबा असल्याचा फॅक्स राज्यपाल सत्यपाल मलिक यांना केला, परंतु तत्कालीन राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी त्यांची फॅक्स मशीन



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDXXV) 425
ISSN : 2278-9308
August, 2023

बिघडल्याचे कारण दिले. आपल्यापर्यंत त्यांचा सत्ता स्थापनेचा दावा पोहोचला नसल्याचं त्यांनी म्हटलं. परिणामी त्यांनी विधानसभा बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लावली जावी अशी शिफारस केंद्राला केली.

वरील घटनांवरून राज्यपालाच्या अधिकार व भूमिकेविषयी असे सांगता येईल की राज्यपाल हा केंद्र सरकारच्या मर्जीनुसार वागताना दिसत असल्याची उदाहरणे सत्तर वर्षाच्या भारतीय संसदीय लोकशाहीत पाहावयास मिळतात. राज्यपालाला विवेकाधीन अधिकार असूनही ते त्याचा वापर करताना दिसत नाहीत. केंद्र सरकारची मर्जी व त्यांचे अस्तित्व टिकविण्याकरता आपल्या अधिकाराचा वापर करून घटक राज्यातील विरोधी पक्षाचे दमन करण्याचा सतत प्रयत्न वरील घटनांवरून दिसून येतो. जेव्हा जेव्हा केंद्रात सरकारे बदलतात तेव्हा घटक राज्यातील राज्यपाल देखील बदलल्याची अनेक उदाहरणे संसदीय लोकशाहीत पावास मिळतात. राज्यपालाचे पद हे संवैधानिक असून देखील राज्यपाल केंद्रातील सत्तेच्या सांगण्यापलीकडे जात नाही कारण राजकीय पुनर्वसनासाठी राज्यपाल पदाचा वापर होतो.

राज्यपाल राजकीय का वागतात याचे कारण सांगताना घटना तज्ञ उल्हास बापट सांगतात, "कायद्यानुसार राज्यपाल पंतप्रधानाच्या सल्ल्याने कार्य करतात. त्यामुळे त्याला राजकीय स्वरूप येतं, परिणामी पंतप्रधानाची मर्जी असेपर्यंत राज्यपाल पदावर राहतात. इंदिरा गांधींनी विरोधी पक्षांची सरकारे पाडण्यासाठी राज्यपालांचा वापर केला. आता मोदीही तेच करत आहेत पार्टी विथ डिफरन्स वगैरे काही नाही सर्व राजकीय पक्ष सारखेच असतात"

**निष्कर्ष**

घटक राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत न मिळाल्याचे आणि सरकार स्थापन करण्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर राज्यपाल पद हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेस आला आहे. असे म्हणता येईल की राज्यपाल पद निरर्थक आहे आणि राज्य सरकारवर आर्थिक भार आहे. परंतु राज्यपालांनी बजावलेल्या भूमिकेकडे आपण दुर्लक्ष करून चालणार नाही. राज्यपाल केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील दुवा म्हणून काम करतात,ते घटक राज्यात सरकार स्थापनेत मदत करतात आणि विधानसभेत मंजूर झालेल्या विधेयकांच्या कायदेशीर तेवर लक्ष ठेवतात.त्यामुळे लोकशाहीच्या सुदृढ कारभारात राज्यपालांची आवश्यकता दुर्लक्षित करता येत नाही. मात्र ही वस्तुस्थिती आहे की राजकीय हस्तक्षेपामुळे या पदाबाबत यापूर्वी प्रश्न उपस्थित झाले आहेत. राज्यपाल पदाची संबंधित या वाद आणि आव्हानांकडे लक्ष दिले पाहिजे आणि सर्व संबंधितांची बोलून त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

राज्यपालांचे नियुक्ती आणि कार्यकाल अशा संबंधित तरतुदींमध्ये मोठ्या सुधारणांची आवश्यकता आहे.1970 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या राजमन्नार समितीच्या शिफारशी लागू कराव्यात आणि राज्यपालांच्या नियुक्ती प्रक्रियेत राज्यांचाही समावेश करण्यात यावा. केंद्र राज्य समीकरणामधील असमतोल दूर करण्याची सुरुवात अशा सुधारणांनी होऊ शकते. राज्यपालांनी घेतलेले निर्णय न्यायालयाच्या देखरेखी खाली आणले पाहिजेत.राज्यपालाचे अधिकार व विशेषअधिकार उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेसह जोडलेले असले पाहिजे. राज्यपालांच्या विवेकाधिकारांवर अंकुश ठेवला पाहिजे आणि मुख्यमंत्र्याचे नियुक्ती बाबत योग्य मार्गदर्शक तत्वेअसावी.

**संदर्भ**

1.डॉ अलका देशमुख - भारतीय शासन आणि राजकारण श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
2.भा ल भोळे - भारताचे शासन आणि राजकारण पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स , नागपूर
3.प्रा चिं ग घांगरेकर - भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकारण श्री मंगेश प्रकाशन रामदास पेठ नागपूर
4.अक्षरनामा - मराठी ऑनलाईन लेखक व्ही एल एरंडे
5.दै. प्रभात - लक्षवेधी,(राज्यपाल विरुद्ध राज्य सरकारे)
6.दै.लोकसत्ता www.loksatta.com अग्रलेख रा रा रवी
7.बीबीसी-www.bbc.com



Scanned with OKEN Scanner

2023-24

We the Research Organization will do provide help for the following works listed below.

*Support for Arts, Commerce & Science all Disciplines*

- Research Paper Publication
- Book Chapters for Publications
- ISBN Publications Supports
- M.Phil Dissertations Publish
- Ph.D. Thesis in Book Format
- ISSN Journals with Impact Factor 8.632
- Online Book Publication
- Seminar Special Issues
- Conference Proceedings

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

**Mobile : 9595560278 /**

Scanned with OKEN Scanner